सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/ २१ दिनांक :- ०३ फेब्रुवारी, २०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय**:- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा-२०२१ अंतिम निकाल.

**संदर्भ**:- १. जाहिरात क्र.२७०/२०२१, दिनांक २३ डिसेंबर, २०२१
२. जाहिरात क्र. ४८/२०२२, दिनांक २७ मे, २०२२
३. क्रमांक-एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/२१, दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक. [तात्पुरती शिफारस यादी व गुणवत्ता यादी]

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा – २०२१ या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत अंतिम निकालानुसार सदर परीक्षेत विज्ञापित केलेल्या एकूण ६३ पदांपैकी ६२ पदांवर उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येत आहे. मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या काही रिट याचिकांवर अद्याप अंतिम आदेश झालेले नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत ०१ पदावरील शिफारस स्थगित ठेवण्यात आली आहे. त्यावर अंतिम आदेश झाल्यावर अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.

३. प्रस्तुत परीक्षेमध्ये श्री. भैसारे सुबोध अशोक (बैठक क्रमांक- MB001010) हे राज्यात प्रथम आले आहेत. तसेच महिलांमधून श्रीमती बागडे रेवती प्रशांत (बैठक क्रमांक- AU001102) या प्रथम आल्या आहेत.

४. प्रस्तुत परीक्षेच्या निकालान्वये शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता, मागासवर्गीय आरक्षणाचे दावे, नॉनक्रिमिलिअर, अनुभव इ. दाव्यानुसार त्यांच्या प्रमाणपत्राची वैधता तसेच पदासाठीची पात्रता शासनाकडून/ निगडित प्राधिकरणांकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शिफारस करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपुस्तिकेतील गुणांची फेरपडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावी.)

उपसचिव (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण- मुंबई